RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ५, अंक १३३(५)] शुक्रवार, सप्टेंबर २०, २०१९/भाद्र २९, शके १९४१ [पृष्ठे ६, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक ३७४

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**

**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### महसूल व वन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक २० सप्टेंबर २०१९

### आदेश

**महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम.**

क्रमांक मुद्रांक-२०१९/अनौ.सं.क्र. २३/प्र.क्र. ३२८/म-१(धोरण).—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक मऔधो-२०१९/प्र.क्र.६/उद्योग-२, दिनांक ७ मार्च २०१९ याद्वारे महाराष्ट्र नवीन औद्योगिक धोरण-२०१९ (ज्याचा उल्लेख यात यापुढे "उक्त धोरण" असा करण्यात आला आहे) घोषित केले आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, पात्र घटकांना जमीन संपादनासाठी आणि मुदतीचे कर्ज प्राप्त करून घेण्यासाठी परस्पर आर्थिक प्रोत्साहने म्हणून मुद्रांक शुल्कामध्ये संपूर्णतः किंवा अंशतः सूट तथा माफी देण्याच्या उद्देशाने, उक्त धोरणांतर्गत, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक साप्रयो-२०१९/प्र.क्र.४६/उद्योग-८, दिनांक १६ सप्टेंबर २०१९ द्वारे, सामुहिक प्रोत्साहन योजना-२०१९ (ज्याचा उल्लेख यात यापुढे "उक्त साप्रोयो-२०१९ योजना" असा करण्यात आला आहे) घोषित केली आहे;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८ चा ६०) (ज्याचा उल्लेख यात यापुढे "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) च्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, आणि या बाबतीत महसूल व वन विभागाने यापूर्वी सामुहिक प्रोत्साहन योजना-२०१३ (साप्रोयो-२०१३) करीता काढलेल्या सर्व शासन आदेशांचे अधिक्रमण करून, लोकहितास्तव, तसे करणे आवश्यक असल्याची महाराष्ट्र शासनाची खात्री पटल्याने, महाराष्ट्र शासन, याद्वारे, दिनांक १ एप्रिल २०१९ पासून सुरू होणाऱ्या आणि दिनांक ३१ मार्च २०२४ रोजी संपणाऱ्या (दोन्ही दिवस पकडून) किंवा साप्रोयो-२०१९ चा कालावधी सुरू असे पर्यंतच्या कालावधीकरिता, उक्त साप्रोयो-२०१९ योजनाच्या

स्तंभ (२) मध्ये नमूद पात्र समुहाच्या युनिट तथा घटक किंवा प्रकल्पांच्या संबंधात त्यांच्या गुंतवणूक कालावधीकरिता, सदर आदेशासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (३) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे सदर आदेशासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दस्त तथा संलेखावर उक्त अधिनियमाच्या अनुसूची-१ मधील तरतुदीनुसार आकारणी योग्य असलेले मुद्रांक शुल्क, खालील नमूद अटी तथा शर्तींच्या अधिन राहुन, माफ किंवा कमी करीत आहे ;–

**शर्ती :—**

(१) उक्त साप्रोयो-२०१९ योजनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अंमलबजावणी अभिकरणाने किंवा उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने, यासंबंधात प्राधिकृत केलेल्या अन्य कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्याने, कोणताही प्रकल्प किंवा उद्योग किंवा युनिट तथा घटक हा उक्त साप्रोयो-२०१९ योजनेखाली पात्र असल्याबाबत 'मुद्रांक शुल्क माफी किंवा सवलत प्रमाणपत्र' देऊन, प्रमाणित करणे आवश्यक आहे.

(२) अंमलबजावणी अभिकरणाने 'मुद्रांक शुल्क माफी किंवा सवलत प्रमाणपत्रा' मध्ये पात्र घटकाच्या गुंतवणूक कालावधीचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे.

(३) नवीन युनिट तथा घटक यांच्यासोबतच विस्तारीकरण किंवा विविधीकरण करणारे युनिट तथा घटक यांना देखिल त्यांच्या गुंतवणूक कालावधीकरिता सदर आदेशाखाली मुद्रांक शुल्कामधील सवलत किंवा माफीचा लाभ देय राहील.

(४) सदर आदेशास जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्र तथा झोनकरिता सदर आदेशाखाली मुद्रांक शुल्कामधील सवलत किंवा माफीचा लाभ देय राहील.

(५) सदर आदेशाखाली मुद्रांक शुल्कामधील सवलत किंवा माफीचा लाभ घेतलेला पात्र घटक, हा त्याच व्यवहारासाठी, इतर कोणत्याही आदेशानुसार किंवा धोरणानुसार, मुद्रांक शुल्कामधील सवलत किंवा माफीचा लाभ मिळण्यास पात्र तथा हक्कदार असणार नाही.

(६) सदर आदेश **महाराष्ट्र शासन राजपत्रात** अधिसूचित होऊन प्रसिद्ध होण्याच्या दिनांकापूर्वी कोणत्याही युनिट तथा घटकाने याआधीच, मुद्रांक शुल्काचा भरणा केला असल्यास, त्यांना उक्त भरलेल्या मुद्रांक शुल्काचा परतावा मिळणार तथा अनुज्ञेय असणार नाही.

(७) असा, कोणताही युनिट तथा घटक जो की, सदर आदेशास जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दस्त तथा संलेखाला पक्षकार असेल आणि ज्याने सदर आदेशाखाली मुद्रांक शुल्कामधील सवलत किंवा माफीचा लाभ घेतलेला आहे, परंतू, त्याने उक्त साप्रोयो-२०१९ योजनेची किंवा उक्त धोरणाची प्रयोजने किंवा उद्दिष्टे, यांची पूर्तता करण्यात कसुर केला, किंवा सदर आदेशाच्या अटी तथा शर्तींपैकी कोणत्याही अटी तथा शर्तीचा भंग केला तर, जणूकाही सुरुवातीपासूनच त्यास मुद्रांक शुल्कामध्ये सवलत तथा माफी देण्यात आली नाही, असे समजून, असा घटक तथा पक्षकार हा, संपूर्ण मुद्रांक शुल्क व दंड तथा शास्ती लागु असल्यास, भरण्यास पात्र असेल.

(८) उक्त साप्रोयो-२०१९ योजनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अंमलबजावणी अभिकरणाने नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सदर आदेशाखाली मुद्रांक शुल्कामधील सवलत किंवा माफीचा लाभ घेतला आहे, परंतू, उक्त साप्रोयो-२०१९ योजनेची किंवा उक्त धोरणाची प्रयोजने किंवा उद्दिष्टे, यांची पूर्तता करण्यात कसुर केला, किंवा सदर आदेशाच्या अटी तथा शर्तींपैकी कोणत्याही अटी तथा शर्तीचा भंग केला आहे, अशा सर्व युनिट तथा घटकांची नावे आणि इतर आवश्यक अनुषंगिक माहिती नियमितपणे कळविणे आवश्यक आहे.

**स्पष्टीकरण :—**

(१) सामुहिक प्रोत्साहन योजना-२०१३ अंतर्गतचे पात्र, नवीन युनिट किंवा विस्तार युनिट, हे देखिल त्यांच्या गुंतवणूक कालावधीकरिता सदर आदेशाखाली मुद्रांक शुल्कामधील सवलत तथा माफीच्या लाभासाठी पात्र असतील.

(२) संपादित केलेल्या जमिनीचे भाडेपट्टाद्वारे किंवा अभिहस्तांतरण पत्राद्वारे किंवा भाडेपट्ट्याच्या अधिकाराचे अभिहस्तांकनाद्वारे किंवा विक्री प्रमाणपत्राद्वारे हस्तांतरण करण्यासाठी उक्त साप्रोयो-२०१९ योजनेखालील पात्र घटक आणि तद्नंतरचा घटक तथा युनिट यांच्या दरम्यान निष्पादित होणारा संलेख तथा दस्त हा सदर आदेशाखाली मुद्रांक शुल्कामधील सवलत तथा माफीचा लाभ मिळण्यासाठी पात्र असणार नाही.

(३) उक्त साप्रोयो-२०१९ योजनेखालील पात्र घटक आणि तद्नंतरचा घटक यांचे दरम्यान करण्यात येणारा/येणारे पुढील व्यवहार हा/हे सदर आदेशाखाली मुद्रांक शुल्कामधील सवलत तथा माफी मिळण्यास पात्र तथा हकदार असणार नाहीत. थोडक्यात, युनिट ते युनिट किंवा घटक ते घटक यांच्या दरम्यान होणारे हस्तांतरण हे, सदर आदेशाखाली मुद्रांक शुल्कामधील सवलत तथा माफी मिळण्यास पात्र असणार नाहीत.

**अनुसूची**

| अ.क्र. | युनिट तथा घटक आणि झोन | अनुज्ञेय सवलत मर्यादा | उक्त अधिनियमातील अनुसूची-१ मधील अनुच्छेदानुसार संलेखाचे प्रकार |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | उक्त साप्रयो-२०१९ योजनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या गट क, ड, ड + तालुका, विना उद्योग जिल्हे, आकांक्षी जिल्हे आणि नक्षली प्रभावित भाग तथा क्षेत्रामधील सर्व पात्र घटक तथा युनिटे. | १००% | अभिहस्तांतरणपत्र (अनुच्छेद-२५), भाडेपट्टा (अनुच्छेद-३६), अभिहस्तांकनाद्वारे भाडेपट्यांचे हस्तांतरण (अनुच्छेद-६०), विक्रीचे प्रमाणपत्र (अनुच्छेद-१६), मुदत कर्ज (हक्क विलेख-निक्षेप संबंधी करारनामा-अनुच्छेद-६), गहाणखत (अनुच्छेद-४०) आणि गहाण मालमत्तेवर अधिक प्रभार (अनुच्छेद-३३). |
| २ | उक्त साप्रयो-२०१९ योजनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या गट 'अ आणि ब' वर्गीकृत क्षेत्रामधील सार्वजनिक पार्कातील जैविक तंत्रज्ञान उत्पादन युनिटे आणि माहिती तंत्रज्ञान उत्पादन युनिटे. | १००% | अभिहस्तांतरणपत्र (अनुच्छेद-२५), भाडेपट्टा (अनुच्छेद-३६), अभिहस्तांकनाद्वारे भाडेपट्यांचे हस्तांतरण (अनुच्छेद-६०), विक्रीचे प्रमाणपत्र (अनुच्छेद-१६), मुदत कर्ज (हक्क विलेख-निक्षेप संबंधी करारनामा-अनुच्छेद-६), गहाणखत (अनुच्छेद-४०) आणि गहाण मालमत्तेवर अधिक प्रभार (अनुच्छेद-३३). |
| ३ | उक्त साप्रयो-२०१९ योजनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या गट 'अ' आणि 'ब' वर्गीकृत क्षेत्रामधील खाजगी पार्कातील जैविक तंत्रज्ञान उत्पादन युनिटे आणि माहिती तंत्रज्ञान उत्पादन युनिटे. | ७५% | अभिहस्तांतरणपत्र (अनुच्छेद-२५), भाडेपट्टा (अनुच्छेद-३६), अभिहस्तांकनाद्वारे भाडेपट्ट्यांचे हस्तांतरण (अनुच्छेद-६०), विक्रीचे प्रमाणपत्र (अनुच्छेद-१६), मुदत कर्ज (हक्क विलेख-निक्षेप संबंधी करारनामा-(अनुच्छेद-६), गहाणखत (अनुच्छेद-४०) आणि गहाण मालमत्तेवर अधिक प्रभार (अनुच्छेद-३३). |
| ४ | 'अ' आणि 'ब' वर्गीकृत क्षेत्रामधील (उक्त साप्रोयो-२०१९ योजनेच्या टेबल चार मध्ये उल्लेख केलेले) मोठे प्रकल्प आणि उक्त साप्रयो-२०१९ योजनेमध्ये विनिर्दिष्ट केलेले मेगा आणि अल्ट्रा मेगा प्रकल्प. | ५०% | अभिहस्तांतरणपत्र (अनुच्छेद २५) आणि भाडेपट्टा (अनुच्छेद-३६) खालील पहिला दस्त. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्रितमकुमार व. जावळे,**
कार्यासन अधिकारी.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 20th September 2019

### Order

MAHARASHTRA STAMP ACT.

No. Mudrank-2019/U.O.R.No. 23/C.R. 328/M-1(Dhoran).—Whereas the Government of Maharashtra has *vide* Government Resolution, Industries, Energy and Labour Department, No. MIP-2019/C.R.6/Ind-2, dated the 7th March 2019 declared the Maharashtra New Industrial Policy-2019 (hereinafter referred to as "the said Policy") ;

And Whereas under the said policy, the Government of Maharashtra has *vide* Government Resolution, Industries, Energy and Labour Department, No. PSI-2019/CR 46/IND-8, dated the 16th September 2019 declared the Package Scheme of Incentives-2019 (hereinafter referred to as "the said PSI-2019 scheme") to provide *inter alia* fiscal incentives in the form of full or partial waiver of stamp duty for the eligible units for acquiring land and for term loan purposes, as per Schedule appended ;

Now, Therefore, in exercise of the powers conferred by clause (a) of section 9 of the Maharashtra Stamp Act (LX of 1958) (hereinafter referred to as "the said Act"), and in supersession of all previous Government Orders issued for Package Scheme of Incentives-2013 (PSI-2013), the Government of Maharashtra, being satisfied that it is necessary to do so in the public interest, hereby remits or reduces the stamp duty to the extent as specified in column (3) of the Schedule appended hereto, chargeable under various Articles of the Schedule-I appended to the said Act, on the instruments specified in column (4) of the schedule appended hereto, in respect of the eligible category of units or projects specified in column(2) thereof as per the said PSI-2019 scheme, for the period starting from the 1st April 2019 and ending on 31st March 2024 (inclusive of both days) or for the currency of PSI-2019, for their respective investment period subject to the following conditions, namely :—

*Conditions*—

(1) The implementing Agency as specified in the said PSI-2019 scheme or any other Competent Authority, authorized by the Industries, Energy and Labour Department in this behalf, must certify the eligibility of any project or industry or unit under the said PSI-2019 scheme, by providing stamp duty remission or reduction certificate.

(2) The implementing Agency must specify the investment period of any eligible unit in the stamp duty remission or reduction certificate.

(3) The benefit of stamp duty remission or reduction under this Order is applicable to all eligible new units as well as units undertaking expansion or diversification during their investment period.

(4) The benefit of stamp duty remission or reduction under this Order is applicable to the zones as specified in the Schedule appended to this order.

(5) The eligible unit which has availed of the remission or reduction of stamp duty under this Order shall not be entitled for remission or reduction of stamp duty for the same transaction as per any other order or policy.

(6) No refund shall be granted where the stamp duty has already been paid by any unit, prior to the date of publication of this Order in the *Maharashtra Government Gazette*.

(7) Any eligible unit who is party to the document as specified in column (4) of the Schedule appended hereto, for which the remission or reduction in the stamp duty is granted under this Order, and who fails to fulfil the purpose or objectives of the said PSI-2019 scheme or the said Policy or commits breach of any of the conditions as specified in this Order, shall be liable to pay the whole stamp duty and penalty, if any, as if there was no remission or reduction in stamp duty from the beginning.

(8) The implementing agency as specified in the said PSI-2019 scheme must convey to the Inspector General of Registration and Controller Stamps, Maharashtra State, Pune on regular basis the names and details of the units which have availed of remission or reduction of the stamp duty under this order but failed to fulfil the purpose or objectives of the said PSI-2019 scheme or the said Policy or committed breach of any of the conditions as specified in this Order.

*Explanation*—

(1) Eligible new or expansion units of Package Scheme of Incentives-2013 shall also be eligible for the benefit of stamp duty remission or reduction under this Order during their investment period.

(2) The benefit of stamp duty reduction or remission provided by this Order shall not apply to the instrument or document/s of transfer of acquired land by way of lease or conveyance or assignment of lease rights or sale certificate executed between the eligible unit and the subsequent unit under the said PSI-2019 scheme.

(3) Further transactions between the eligible unit and the subsequent or the next unit under the said PSI-2019 scheme shall not be eligible for the remission or reduction in the stamp duty under this order. Thus unit to unit transaction shall not be eligible for stamp duty remission or reduction under this order.

*Schedule*

| Sr. No. | Type of Units and Zone | Extent of Remission | The type of Instruments under Articles of the Schedule I of the said Act. |
|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) |
| 1. | All eligible units in Group C, D and D+ Talukas, No-Industry Districts, Aspirational Districts and Naxalism affected areas as specified in the said PSI-2019 scheme. | 100% | Conveyance (Article 25), Lease (Article 36), Transfer of Lease by Assignment (Article 60), Certificate of Sale (Article 16), Term Loan agreement relating to deposit of title deed (Article 6), Mortgage deed (Article 40) and Further charge on Mortgaged property (Article 33). |
| 2. | Bio-Technology (B.T.) Manufacturing Units and Information Technology (I.T.) Manufacturing Units in Public Parks in Group 'A' and 'B' areas as specified in the said PSI-2019 scheme. | 100% | Conveyance (Article 25), Lease (Article 36), Transfer of Lease by Assignment (Article 60), Certificate of Sale (Article 16), Term Loan agreement relating to deposit of title deed (Article 6), Mortgage deed (Article 40) and Further charge on Mortgaged property (Article 33). |

*Schedule*

| (1) | (2) | (3) | (4) |
|---|---|---|---|
| 3. | Bio-Technology (B.T.) Manufacturing Units and Information Technology (I.T.) Manufacturing Units in Private Parks in Group 'A' and 'B' areas as specified in the said PSI-2019 scheme. | 75% | Conveyance (Article 25), Lease (Article 36), Transfer of Lease by Assignment (Article 60), Certificate of Sale (Article 16), Term Loan agreement relating to deposit of title deed (Article 6), Mortgage deed (Article 40) and Further charge on Mortgaged property (Article 33). |
| 4. | Large Projects (as defined in Table 4 of the said PSI-2019 scheme) and Mega and Ultra Mega Projects in Group 'A' and 'B' areas as specified in the said PSI-2019 scheme. | 50% | First Conveyance (Article 25) or First Lease Deed (Article 36). |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRITAMKUMAR V. JAWALE,

Desk Officer.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : DIRECTOR, DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.